, ठाणे.

IRBK-0101889

IRBK-0101889

म. ग्रं. सं. वाचनालय
विषय ... 
दा. क्र. ...


# बांच्या मुली





IRBK-0101889
IRBK-0101889

माधव मनोहर

भारत प्रकाशन संस्था

ल-वाङ्मयमाला २९

# आजोबांच्या मुली

माधव मनोहर

किंमत ५ आणे

: प्रकाशक :

नवभारत प्रकाशन संस्था, मुंबई, ४.

एका सुप्रसिद्ध इंग्रजी एकांकी नाटकांतील कल्पनेचें हें मनःपूत व स्वैर मराठी रुपांतर आहे.

या एकांकिकेचा पहिला प्रयोग मुंबई मराठी साहित्य संघाच्या संघदिन प्रसंगीं ( रविवार दिनांक २२ ऑगस्ट १९४३ रोजीं ) ब्लॅव्हॅट्स्की लॉज्मधें करण्यांत आला.

| | |
|---|---|
| निर्मिति | " मराठी नाट्यालय " |
| दिग्दर्शन. | प्रभाकर के. गुते. |

( भूमिकाः प्रवेशानुक्रमानें )

| | |
|---|---|
| ताईः | नलिनी नागपूरकर, जी. ए. |
| गृहस्थः | दि. वि. आमोणकर. |
| बनीः | मालती भालेराव. |
| अण्णाः | शं. पां. ओक. |
| आक्काः | चारुशीला गुते. |
| नानाः | अनंत वर्तक. |
| आजोबाः | बळवंतराव परचुरे. |

[ **स्थळ**:—पुणें. मध्यमवर्गांतील एका सुखवस्तू कुटुंबाचें राहतें घर. एक छोटा दिवाणखाना. डाव्या बाजूला खिडकी. पडदे ओढलेले. खिडकीखालीं कोच. मागच्या भिंतींत मधोमध दरवाजा. खालीं पलीकडे पायऱ्या. त्यापलीकडे रस्ता. डाव्या बाजूच्या कोपऱ्यांत अनेक चित्रविचित्र वस्तूंनीं भरलेलें काचेचें कपाट. आंत बाहुल्या, खेळणीं, लाकडी फळें, कांचसामान इत्यादि प्रेक्षणीय समजल्या जाणाऱ्या वस्तूंचें प्रदर्शन. मधल्या दरवाजाजवळ आणखी एक खिडकी. डाव्या बाजूला उजव्या बाजूच्या भिंतींत दार—माजघरांत आणि माडीवर जाण्यासाठीं. दाराजवळ एका बाजूला एक मोडकें कपाट. दुसऱ्या बाजूला पुढें एक मोठी थोरली आरामखुर्ची. पायाशीं नक्शीकाम केलेल्या मौल्यवान् चंदनी खडावा. जवळ एक छोटें स्टूल. मध्यभागीं एक भलें मोठें टेबल. वर चादर. भोंवतालीं पांच खुर्च्या. उजव्या बाजूला दोन. डाव्या बाजूला दोन. मागें एक. टेबलावर चहाचें साहित्य अर्धवट मांडलेलें. आरामखुर्चीवर 'केसरी'. टेबलावर 'सह्याद्रि'. भिंतीवर जुनाट तसबिरी—रविवर्म्यांच्या—शंकरभिल्लीण, शुकरंभा, मोहिनी, पुरुरवाउर्वशी, राधाकृष्ण, शंतनुधीवरकन्या दुष्यंतशकुंतला. मधून मधून भरतकामाचे भडक नमुने—गाजर खाणारा ससा, ग्लॅक्सोचं बाळ, वेल्कम वगैरे. खोलींतील सर्व सामानावर जुनाटपणाची अवकळा पसरलेली.

पडदा उघडल्याबरोबर एका मध्यमवयीन स्त्रीचें दर्शन होतें. लठ्ठ, लालबुंद चेहऱ्याची, जहांबाज अशी. ती एक मळकट लुगडें नेसली आहे. पदर खोवलेला, डोळे सुजलेले, केस विस्कळित. मधून मधून हाताच्या मुठींनीं ती बळेंच डोळे चोळते. चहाच्या पूर्वतयारींत ती दंग आहे. या ताईसाहेब. ]

**बाहेरून**:—अण्णासाहेब अहो अण्णासाहेब—( अशा हांका. )

**ताई**:—कोण आहे ? आलेंच हं. ( दरवाजा उघडते ).

[ एक गृहस्थ आंत येतात. अनवाणी आणि बोडखे. ]

**गृहस्थ**:—अजून नाहीं आले अण्णासाहेब ? उगाच उशीर...

**ताई**:—हं...पण येतीलच इतक्यांत. सकाळींच साहेबाचं बोलावणं आलं... बढतीचा प्रश्न आहे, म्हणून . नाहींतर अशावेळीं बाहेर का जाईल कुणी ?...बसा ना...

**गृहस्थ**:—नाहीं. बसत नाहीं आतां. मी जरा जाऊन येतों. रावजींना कळवतों आधीं. ( आठवल्या सारखं करुन ) काय ? आक्का आली का ?

**ताई**:—नाहीं. अजून नाहीं आली. काल रात्रींच तार केली आहे तिला. गाडीची वेळ झालीच आहे. येईलच आतां ती. बसा कीं जरा. चहा घ्या थोडा अन् मग जा पुढं...

**गृहस्थ**:—नको. नको. चहा फार वेळ झाला आहे आज. ज्याला ज्याला म्हणून बोलवायला गेलों, त्यांन त्यानं मला चहा पाजला. आणि पुनः जाईन तिथें होईलच. अशानं मीच खतम् व्हायचा मधल्यामधें आणि मग मलाच न्यायची पाळी यायची ! ( हंसतात. ) अच्छा. अण्णासाहेब येताहेत, तोंपर्यंत मी मंडळींना घेऊन येतों. हो. मागाहून उशीर नको उगीच. रामभाऊ गेले आहेत सामानाच्या व्यवस्थेला—

**ताई**:—पण लवकरच या हं. नाहीं तर मग दुपारचे चार होतील आणि पोटांत लागतील कावळे ओरडायला.

**गृहस्थ**:—हा आलोंच. ( जातात. )

**ताई**:—( एक क्षणभर उगीचच इकडे तिकडे करते. मग मागच्या खिडकीजवळ जाऊन पडदे सरकवते. खिडकींतून उन्हें आंत येतात. खिडकी उघडून रस्त्यावर कोणाला तरी हांक मारते. ) बने, बने, ए बनेऽऽ ( मोठ्यानें ओरडून ) बनिटलेऽ कारटेऽ, कान फुटले का तुझे ? चल, होतेस कीं नाहीं घरांत ? चहाटळ कुठली. नाहीं येत ? थांब हो. मग मीच येतें तर बाहेर. चल. हो घरांत. ( पुनः खिडकी बंद करून पडदे सरकवते, आणि आपल्या कामाला लागते. )

[ मागच्या दारांतून एक मुलगी हळूंच चोरट्यासारखी आंत येते. ही बनी—वय वर्षें दहा. एक रंगीबेरंगी भडक साडी नेसली आहे. ]

**बनी**:—काय ग आई ?

**ताई**:—काय ग आई ? ( वेडावते. ) अन् तोंड करून वर मलाच विचारतेस काय आणखी ? आत्तांच कशाला मरायला बाहेर गेली होतीस ? कांहीं अडलं होतं आत्तांच बाहेर जायचं ? अं ? अग टवळे, उनाडशील तरी किती ? कांहीं सुमार त्याला ? भटकभवानी, कांहीं काळवेळ तरी कळते कीं नाहीं तुला ? वर तुझे आजोबा थंडगार होऊन पडले आहेत, आणि तूं मारे साजशिणगार करून फिरते आहेस गांवभर वेल घालीत. कांहीं लाजलज्जा आहे कीं नाहीं तुला ? आणि काय ग...मारे नवीन साडी नेसली आहेस ती ? कोण वेसवा आहेस का कोण आहेस ?

**बनी**:—हें ग काय आई तुझं असं बोलणं. वा ग वाः आज आमच्या शाळेचं गॅदरिंग आहे. अन् मला त्यांत पार्ट करायचा आहे.

**ताई**:—म्हणे पार्ट करायचा आहे. ( वेडावते. ) तुला कांहीं काळवेळेची शुद्ध आहे कीं नाहीं ? ( तिचे दंड धरून हलवते आणि बळेंच तिचे केस विस्कळित करते. ) चल सोडून ठेव ती साडी आधीं.

**बनी**:—आणि काय करूं ?

**ताई**:—आणि काय करूं ? तशीच हिंड गांवभर...म्हणे काय करूं ? ( वेडावते. ) आधीं एखादा जुना परकर शोधून नेस...पाहतेस काय माझ्याकडे ? निर्लज्ज मेली.

[ बनी आंत जाते. ताई चहाच्या तयारीला लागते. ]

**बनी**:—( आंतून एक कोरा परकर घेऊन येते. ) हा नेसूं ?

**ताई**:—बाई बाई बाई, अगदीं शर्थ झाली तुझ्यापुढं हो. अगऽ तो नवा परकर नको नेसूंस, म्हणून हजारदां सांगितलं ना तुला...वेंधळी मेली. जुना फाटका नेस एखादा. फाटका नसेल तर फाड बळेंच. आणि चल आटप लौकर. आत्तां आक्काबाईचा फेरा येईल इकडे.

**बनी**:—पण आजच कशाला आक्कामावशी येते आहे ग ? कितीतरी वर्षांत ती कधीं फिरकली सुद्धां नाहीं आपल्याकडे.

**ताई**:—चूप बैस, म्होंबडी कुठली ! तुला काय करायच्या आहेत या नसत्या चांभारचौकशा ?

**बनी**:—पण सांग नाग आई...असं ग काय करतेस ?

**ताई**:—तुझ्या आजोबांना भेटायला येणार आहे ती हो.

**बनी**:—आजोबांना भेटायला—आणि ते गेल्यावर ?

**ताईः**—हो...ते गेल्यावर.

**बनीः**—कशाला ?

**ताईः**—म्हणे कशाला ? त्यांचं दर्शन घ्यायला. तुला कांहीं कळायचं नाहीं त्यांतलं !

**बनीः**—असं ग काय करतेस आई ?...सांग ना ग.

**ताईः**—अग, काल रात्रीं यांनीं तिला तार नाहीं का केली...म्हणून ती येणार आहे हो.

[ बाहेर दार वाजल्याचा आवाज होतो ]

[ दचकून ] अगबाई, आली कीं काय ती बया...चल हो घरांत.

[ बनी जिन्याच्या दारांत जाऊन उभी राहते. ]

( भीत भीत दार उघडून )...ये...आलीस...कोण ? तुम्हीच का ते ? काय पण घाबरलें मी...बने, ये, बाहेर ये हो. अग हेच आले आहेत.

[ एक मध्यम वयीन गृहस्थ आंत येतात. हे ताईचे यजमान—बनीचे पिताजी ... अण्णासाहेब चांगली जाडजूड आहे स्वारी. पाठींत किंचित् वांकलेली. ओंठावर मिशांचें जंगल. ते ऑफिसच्या पोषाखांत आहेत. त्यांच्या हातांत कसला तरी पुडा आहे. ]

**अण्णाः**—( पुडा जवळच्या स्टुलावर ठेऊन ) अजून आली नाहीं का ती ?

**ताईः**—अहो, तुमचे डोळे चांगले शाबूत आहेत ना ? का खांचा झाल्या आहेत ?...( एकदम आठवण होते जशी कांहीं तिला. ) काय म्हणाला साहेब ? मिळणार आहे का बढती ?

**अण्णाः** —बघूं म्हणाला.

**ताईः**—बघूं म्हणाला ! ( वेडावते. ) पण एकदां तरी वर मान करुन बघितलंत का साहेबाकडे ? तुम्ही त्याच्या समोर नुसते उभे राहिलां असाल शुंभासारखे....आणि ए सटवे, तुला एकदां सांगितलं ना कीं तुझं तें मारवाडी पातळ सोडून ठेव म्हणून ?...चल, हो चालती इथून अगोदर.

**बनीः**—[ जाते. ]

**अण्णाः**—[ आराम खुर्चीवर पसरतात. ]

**ताईः**—[ त्यांच्याकडे आश्चर्यानें पहात ] अहो तुम्ही, तुम्ही सुद्धां बनी एवढे लहान का समजतां स्वतःला ?

**अण्णाः**—अग पण हो...असं झालं तरी काय ?

**ताईः**—म्हणे झालं तरी काय ?—कसं कांहीं कळत नाहीं हो तुम्हांला ?

कुकुलं बाळ का आहांत तुम्ही–अं ?...हं...अगोदर तो भरजरी जामानिमा उतरवा तुमचा...आटपा लौकर...आत्तां आक्काबाईचा फेरा येईल इकडे म्हटलं.

**अण्णा**:—( आत्तांशीक सारं कांहीं लक्षांत आलं आहे त्यांच्या. ) अग पण तुझी ती आक्का खरंच येणार आहे का इथं ?

**ताई**:—कां ? तुम्हांला एवढी शंकाशी आली ?

**अण्णा**:—नाहीं म्हटलं, मागच्या खेपेस तुमचं दोघींचं मोठं कडाक्याचं भांडण झालं, आठवतं ? तेव्हां—

**ताई**:—भांडण ? आणि आमचं ? नंबर एकचे विसरभोळे आहांत तुम्ही. अहो, तीच भांडली माझ्याशीं. माझं अडलंय् ह्याच्या [illegible] तिच्याशीं भांडायला !...बरं पण त्याचं काय आतां ?

**अण्णा**:—अग, पण मला पुरतं बोलूं तरी देशील ? त्यावेळीं तुम्ही दोघी सख्ख्या बहिणी सवतीसवती सारख्या भांडलांत ना, तेव्हां ती या आपल्या घरांतून—

**ताई**:—आपल्या ?

**अण्णा**:—चुकलों–आपल्या नाहीं–तुझ्या या घरांतून निघून गेली. हं. त्यावेळीं ती काय म्हणाली, आठवतं ?

**ताई**:—काय ?

**अण्णा**:—कीं मी फिरून जन्मांत तुझं कधीं तोंड पाहणार नाहीं म्हणून.

**ताई**:—तोंड तर पहा एकदां असं म्हणणारणीचं. काय पण तोरा ! ( वेडावते. ) म्हणे मी तुझं कधीं जन्मांत तोंड पाहणार नाहीं...आत्तां येतील आक्काबाई जिभल्या चाटीत...पहाल तुम्ही...लोण्याचा गोळा आहे ना आतां इथं ?

**अण्णा**:—म्हणजे ?

**ताई**:—नाहीं. तुम्हांला नाहींच समजायचं तें...

**अण्णा**:—मला नाहींच समजायचं ?—राहिलं...

**ताई**:—साऱ्या मुलखाची लोभी आहे आमची आक्का. उकिरड्यावरच्या चिंध्या सुद्धां गोळा करून आणिल ती आपल्या घरीं. लहानपणापासून पाहतें आहे मी तिचं हें सारं—मग कोणापासून तिनं हा हावरेपणा उचलला आहे, कुणास ठाऊक ?

**अण्णा**:—( भीत भीत, तिचं लक्ष नाहीं असं पाहून, हळूच– ) मी सांगूं ? हा

लोभीपणा तुझ्या घराण्यांत अगदीं वंशपरंपरागत चालत आलेला आहे. बापाकडून मुलाकडे—नाहीं,—मुलीकडे—

**ताई:**—( दरडावणीच्या स्वरांत ) काय–काय म्हणालांत ? पुन: बोला पाहूं.

**अण्णा:**—नाहीं–तसं नाहीं–मी तुझ्या बाबांबद्दल बोलत होतों. तुझ्याबद्दल नाहीं...बऽरं...(उठून, इकडे तिकडे पहात) पण माझ्या खडावा कुठं आहेत ?

**ताई:**—देवा, देवा, तुमचीं पायतणंसुद्धां मला माहीत. नशीब माझं...तिकडे सैपाकघरांत मोरीवर आहेत खडावा...( एकदम आठवून, तावातावानं ) काय पण मेल्या खडावा...एकीचा अंगठाच गेला आहे, आणि दुसरी अर्धीच शिल्लक आहे...( मट्कन् खुर्चीवर बसते. ) अरे देवा. किती छळणार आहेस बाबा अजून, रामराया...गेल्या जन्मीं हातून कांहीं अभद्र घडलं असेल, त्याचीं फळं आज भोगावीं लागताहेत झालं, दुसरं काय ?...( हुंदके देते. )

**अण्णा:**—अग हो, पण एवढे गळे काढायला तुला असं झालं आहे तरी काय ?

**ताई:**—आतां काय व्हायचं राहिलं आहे हो ? किती यातना होताहेत मला—अग आई ग, कोण कष्ट भोगतें आहे मी...रामराया....तूंच रेऽ बाबा तारणारा... बाबांच्या या आवडत्या वस्तू सगळीकडे पडलेल्या आहेत—त्या पाहिल्या कीं कसं अगदीं भडभडून येतं. आतां या बाबांच्या चंदनी खडावा ते कधीं वापरणार नाहींत.—हा विचार मनांत—( एकदम ) बाबांच्या या चंदनी खडावा घाला तुम्ही पायांत...बरं झालं, त्यांनीं आत्तांच नवीन आणल्या होत्या...नाहींतरी तुमच्या खडावा आतां फेंकूनच द्यायला पाहिजे आहेत...घ्या त्या...उचला ना...

**अण्णा:**—( खडावा हातांत उचलून घेतात. )

**ताई:**—असे कसे हो तुम्ही अगदीं बावळट. खडावा उचला म्हटलं, उचलल्या आपल्या खडावा. पायतणं उराशीं का धरायचीं असतात ? ठेवा त्या खालीं.

**अण्णा:**—( खडावा पायांत सरकवीत, भीत भीत ) या मला जरा मोठ्या होतील; नाहीं ? ( आराम खुर्चीवर बसतात. )

**ताई:**—अहाहा ! म्हणे मोठ्या होतील. अहो, आज मोठ्या झाल्या, तर उद्यां तुम्ही मोठे होणार नाहीं का ? म्हणे मोठ्या होतील ! ( कसली तरी आठवण झाल्यासारखं ) पण तुम्ही कांहींतरी खायला घेऊन आलांत ना ! नाहींतर दुपारपर्यंत —नाहीं—रात्रीपर्यंत सुद्धां उपाशी रहावं लागेल.

**अण्णाः**—छेः छेः मी मुळींच विसरलों नाहीं हं. येतांना आजीबाईकडे डोकावलं. ताजी जिलबी होती....एकदम गरम. मग जिलबीच घेऊन आलों झालं.

**ताईः**—जिलबी आणलींत ना ? बरं केलंत. मला बाई जिलबी भारी आवडते. ( एकदम, अनपेक्षित ) हें पहा. बाबांच्या खोलींत तें महागनी ड्रेसिंग—टेबल आहे ना—

**अण्णाः**—आहे. बरं मग ? पुढें बोल कीं.

**ताईः**—तें टेबल किनई आपल्याला हवं आहे गडे.

**अण्णाः**—गडे ?...आणि आपल्याला ?

**ताईः**—हो हो आपल्याला.

**अण्णाः**—अग पण तें आपल्याला आतां मिळणार कसं ? आतां आक्काशीं बोलशील, तेव्हां घे मागून तुला हवंच असेल तर.

**ताईः**—अहाहा ! म्हणे घे मागून. मागून कां आक्काबाई मला घेऊं देणार आहे तें टेबल ? पक्की लोभिष्ट आहे ती. भांडत बसेल मेली एकसारखी माझ्याशीं त्या टेबलासाठीं. खाष्ट आहे ती भारी. मागून मुळींच देणार नाहीं ती.

**अण्णाः**—कदाचित तुझ्या आक्काचा पण त्या टेबलावर डोळा असेल. मग ?

**ताईः**—ऐहेरे ! म्हणे तिचा पण डोळा असेल ! बाबांनीं तें टेबल घेतल्यावर आक्कानं कधीं या घरांत पाय तरी ठेवला आहे कां ? वर बाबांच्या माडींत तें टेबल आहे म्हणून...तें टेबल जर इथं आपल्या या हॉलमधें असलं, तर तिला कधीं पत्तासुद्धां लागणार नाहीं त्या टेबलाचा. मग तिला वाटेल कीं तें आपलंच आहे.

**अण्णाः**—( आत्तांशीक त्यांच्या डोक्यांत प्रकाश पडला आहे ! ) काय म्हणालीस ? ( खुर्चीतून उठूनं ताड्कन् उभे रहातात. )

**ताईः**—उठा ! चला. आत्तांच आपण तें टेबल खालीं आणून ठेवूं या. आक्का येण्यापूर्वीच आपण तें टेबल—

**अण्णाः**—( आश्चर्यचकित ) छट्.

**ताईः**—कां हो ?

**अण्णाः**—आपल्या हातून अशी गोष्ट होणार नाहीं.

**ताईः**—दिवे ओवाळा दिवे. मोठे धर्मराजाचे अवतारच लागून राहिलां कीं नाहीं ! चला.

**अण्णाः**—हें एवढं बरीक काम आपल्याला सांगू नकोस बुवा.

**ताईः**—हें पहा, आपण आपलं हें मोडकं कपाट वर घेऊन जाऊं—

**अण्णाः**—कशाला ?

**ताईः**—आणि तें टेबलाच्या जागीं ठेऊन देऊं, म्हणजे झालं.

**अण्णाः**—तें कशाला ?

**ताईः**—कसं हो तुम्हांला अगदींच कांहीं कळत नाहीं ?

**अण्णाः**—( डोकं खाजवतात. )

**ताईः**—आणि बाबांचं टेबल आपण आपल्या कपाटाच्या जागीं ठेऊन देऊं. आक्काला वाटलं तर खुशाल घे म्हणावं तें मोडकं कपाट...हो, नाहीं तरी मी तें चुलींतच घालणार होतें !

**अण्णाः**—( क्षणभर थांबून ) आणि आपण ही सारी घालमेल करीत असतांनाच आक्का आली तर ?

**ताईः**—बरी आठवण केलींत. आधीं मी पुढच्या दाराला आंतून कडीच घालतें कशी...हं...उतरवा तो जामानिमा आधीं...मनाची नाहीं पण निदान जनाची तरी कांहीं लाजलज्जा ठेवा. आत्तां आक्काबाईचा फेरा येईल—आणि तुम्ही हे असे...उठा...आधीं पंचा गुंडाळा एक...आणि डोक्याला पण...चला...( ती बाहेरच्या दाराला आंतून कडी घालते. )

[ अण्णा आंत जातात. ताई प्रथम स्वस्थ बसते. मग हळूंच जिलबीकडे तिचा हात जातो. तोंच— ]

**अण्णाः**—( तेवढ्यांत आंत जाऊन कपडे बदलून येतात. आतां एक आंखूड धोतर त्यांनीं कसंबसं कमरेभोंवतीं गुंडाळलं आहे आणि डोक्याभोंवतीं एक पंचा आंवळला आहे. खांद्यावर उपरणं वेढलं आहे. ) हं ? आतां ठीक ?...बरं मग, पुढं काय करूं ?

**बनीः**—( तेवढ्यांत येते. आईच्या सूचनेप्रमाणें आपल्या पोषाखांत इष्ट तो फेरफार करण्याचा ती यत्न करते आहे. तिच्या हातांत परकराच्या नाडीचं एक टोंक आहे. ) अण्णा, माझं हें काम करा हो एवढं. ही इकडची नाडी किनई आंत गेली आहे, तेवढी बाहेर काढा पाहूं.

**ताईः**—( वेडावून ) तेवढी बाहेर काढा पाहूं...एहेरे ध्यान मेलं. लहान कां आतां तूं ? एवढी घोडी वाढलीस ना...तुझ्याएवढी माझी आई होती, तेव्हां तिला दोन मुलं झालीं होतीं, ठाऊक आहे ?...आणि तुला अजून

परकरसुद्धां नीट नेसतां येत नाहीं ! ( क्षणभर थांबून ) घाला हो ती नाडी झटपट. ( घाईघाईनं वर जाते. दाणदाण पाय आपटीत. )

**बनीः**—हें हो काय अण्णा ? तुम्ही आपल्या मोडक भटजींसारखा काय हा ड्रेस् केला आहे ?

**अण्णाः**—( स्वतःकडे पहात ) हं हं. हा होय ?

**बनीः**—( एकदम अनावर जिज्ञासेनं ) आई आत्तां एवढी तावातावानं वर कां गेली हो, अण्णा ?

**अण्णाः**—तुझ्या आजोबांचं तें ड्रेसिंग-टेबल आहे ना वर ? तें आतां वरून खालीं घेऊन येणार आहे ती.

**बनीः**—( क्षणभर विचार करून ) अस्सं...आक्का मावशी येण्यापूर्वींच तें लांबवण्याचा विचार आहे वाटतं आईचा.

**अण्णाः**—असं बोलूं नये, बने. ती तुझी आई आहे ना ?...हें बघ—तुझ्या आजोबांनीं तुझ्या आईला तें टेबल देऊन टाकलं आहे. कळलं ?

**बनीः**—देऊन टाकलं आहे ? आणि तें कधीं दिलं हो अण्णा ?

**अण्णाः**—आज सकाळीं.

**बनीः**—सकाळीं ?

**अण्णाः**—नाहीं...सकाळीं नाहीं...रात्रीं. काल रात्रीं.

**बनीः**—पण अण्णा, काल रात्रीं ते शुद्धींत होतेच कुठं.

**अण्णाः**—बने, आतां असं बोलायचं नाहीं हो तुझ्या आजोबांबद्दल. ( तेवढ्यांतच त्यांनीं नाडीचं टोंक बाहेर काढून दिलं आहे. )

[ ताई येते. तिच्या हातांत भिंतीवर लावायचं मोठं घड्याळ आहे. ]

**ताईः**—येतांना हें घड्याळहि घेऊन आलें झालं खालीं. ( मागच्या भिंतीवर एका उंच खिळ्याला तें घड्याळ लावण्याचा तिचा विचार आहे. ) पहात काय राहिलांत नुसते ? ओढा ती खुर्ची इकडे.

**अण्णाः**—( सांगितल्या कामाचे धनी—तसं करतात. ) हं.

**ताईः**—लावा आतां. जपून. नाहीं तर पडाल बिडाल अन् एवढं भारी घडयाळ फुटून जाईल.

[ अण्णा घड्याळ लावतात व तसेच खुर्चीवर उभे राहतात. ]

**बनीः**—पण आई, तें घडयाळ आजोबांचं आहे ना ग ?

**ताईः**—चूप बस कारटे...काल तें आजोबांचं होतं. आज आपलं आहे...चला

हो. खुर्चीवरच काय उभे राहिलां आहांत? अडणी कां आहे ती? उतरा खालीं. आणि या इकडे. धरा त्या बाजूनं—( अर्थातच कपाट. )

**अण्णाः**—( तसं करतात. )

**ताईः**—आणि ए सटवे, आजोबांचं तें घड्याळ अन् तें टेबल आपलं आहे, समजलीस? आक्का आल्यावर खबरदार एक वेडावांकडा शब्द तोंडांतून काढशील तर.

[ ताई आणि अण्णा मिळून कपाट उचलून दारांतून आंत नेतात. ]

**बनीः**—(चालीवर) खोटं कऽधीं बोलूं नये—चोरी कऽधीं करूं नये—कोणासंऽगें भांडूं नये—पाहिलें तें मागूं नये—

[ बाहेरच्या दारावर थाप. क्षणभरानं धक्का. ]

**बनीः**—( अर्धवट दारापर्यंत जाते. थबकते. पुनः परतून मोठ्यानं ) आई—ए—आई—

**ताईः**—( वरून ) काय ग?

**बनीः**—कोणी तरी आलं आहे बघ.

**ताईः**—( वरूनच ) थांब जरा. आक्कामावशीच असेल तर इतक्यांत दार उघडूं नकोस हो.

**बनीः**—( खिडकींतून पहाते. ) आई, ए आई, ( पुनः दाराजवळ जाऊन ) आक्का मावशीच आहे ग आई.—नि तिच्याबरोबर तिचे नाना पण आहेत ग.

**ताईः**—( अजून वरूनच ) मी खालीं आल्याशिवाय दार मुळींच उघडूं नकोस.

[ बाहेर दारावर धक्के बसतात. ]

**ताईः**—( जिन्यांतून ) ओरडूं दे जरा...( जिन्यांत कांहीं तरी धपकन् पडल्याचा आवाज. ) अशानं तुम्ही तर पडालच—पण टेबलहि पडेल...ती भिंत संभाळा ...हळूं...जपून.

[ अखेरीस एकदांचं ड्रेसिंग-टेबल खालीं येतं. टेबल मोठं आहे. दोघेहि भारवाहक घामाघूम झाले आहेत. पूर्वी जिथं कपाट होतें तिथंच ते टेबल ठेवतात. बाहेर दाराच्या फळ्या खिळखिळ्या होत आल्या आहेत! ]

**ताईः**—( समाधानाचा निःश्वास सोडून ) हं...बने.. उघड आतां दरवाजा—अग टवळे, बघतेस काय? उघड म्हणतें ना.

**अण्णाः**—( घाम पुशीत ) हुश्श...भिंतीचा चुना सगळा तुझ्या लुगड्याला लागला आहे बघ.

**ताई:**—तुमचं आंगसुद्धां रंगलं आहे सगळं. ध्यान मेलं !

[ दोघेहि योग्य ती साफसफाई करतात. ताई केंस सांवरते, आणि अण्णांच्या अंगावर 'केसरी'चा अंक भिरकावते. ]

**ताई:**—अहो, केसरी वाचण्याचं सोंग तरी नीट करा...काय पण माणसं भेटलीं आहेत एकेक...आणि नीट बसा जरा.

[ अण्णा 'नीट' बसतात—'केसरी' घेऊन. ताईची चहाची धांदल पुनः सुरू होते. तेवढ्यांत बनी हळूंच दार उघडते. आक्का आणि 'तिचे' नाना आंत येतात. नाना म्हणजे तिचे यजमान. आक्का आपल्या बहिणीचीच दुसरी प्रतिमा. हट्टी, व्यवहारी, निश्चयी. आणि नाना ?—वल्ली आहे हं ही. मोठा मजेदार प्राणी आहे. अगदीं मासलेवाईक. त्यांचा पोषाख प्रवासी. वृत्तीनें विनोदी, सदा हंसतमुख—पण आतां मात्र तसे नाहींत !...परिस्थितीला अनुरूप असे हावभाव आपल्या चेहऱ्यावर दिसावेत, म्हणून स्वारीची केंविलवाणी धडपड चालली आहे. दोघी बहिणी दुरूनच एकमेकींकडे पाहातात. मग जवळ जातात. त्या दोघींपैकीं आतां आधीं कोण रडणार, कुणास ठाऊक ? पण दोघींचीहि तयारी दांडगी आहे. त्या दोघींचंहि हें अवसान पाहून उभयतांचे यजमान त्याच तयारीला—म्हणजे उसनं रडं आणण्याच्या—लागतात. एक क्षणभर कोणींच कोणाशीं बोलत नाहीं. फक्त बनी आळीपाळीनं प्रत्येकाकडे पाहते. चमत्कारिक शांतता. थोडावेळ असाच जातो. मग— ]

**आक्का:**—अखेरीस बाबा आपल्याला सोडून गेले ना ?

**ताई:**—बाबा आपल्याला सोडून गेले ग अखेरीस.

( दोघींच्याहि स्वरांत उसने अश्रू आहेत. )

**नाना:**—तरी पण म्हातारा ऐंशीच्या आसपास असेल नाहीं ? ( जीभ चावतात. )

[ दुःख प्रदर्शनार्थ सारे खालीं बसतात. टेबलाच्या डाव्या बाजूला आक्का, उजव्या बाजूला ताई, आरामखुर्चीत अण्णा, कोचावर नाना, जवळ बनी. नानांना पुनः आपली हुशारी चालवण्याची लहर येते. ]

**नाना:**—हें पहा गोदू, ( हें आक्काचंच खासगी नांव. ) अशी माझ्याकडे बघ पाहूं. हें बघ ए, तूं काय कबूल केलं होतंस ?—अं ! अग असं पहा—आपल्यापैकीं प्रत्येकाला केव्हांतरी या जगांतून जायचंच आहे. अं ? नाहीं कां ? झालं हें एकंदरींत बरंच झालं—अं—

**ताई:**—( आश्चर्यानं ) म्हणजे ?

**नानाः**—नाहीं,...म्हणजे असं पहा, आपल्यापैकींच कुणी—नाहीं म्हणजे—तसं नाहीं म्हणत मी—हो—पण त्याचा काय नेम आहे ?

**अण्णाः**—( आतां कांहींतरी बोललंच पाहिजे म्हणून ) तुम्हांला यायला बराच उशीर झाला तरी...गाडी लेटबीट होती कीं काय ?

**नानाः**—नाहीं. गाडी कांहीं तशी फार लेट नव्हती...म्हणजे तशी थोडीशी लेटच होती, बरं का ?...पण आम्हींच जरा यायला उशीर केला. गांवांत आल्याबरोबर म्हटलं आधीं चौकशी करावी, म्हणून गेलों आजीबाईंच्या खाणावळींत—( पुनः जीभ चावतात. )

**आक्काः**—( एकदम ) बाबा आपल्याला आजच कसे सोडून गेले ग ?

**ताईः**—आपणच कमनशिबी, दुसरं काय. प्राक्तनांत असेल तें भोगलं पाहिजे ना माणसानं.

[ दोघीहि गळा काढण्याचा यत्न करतात. ]

**आक्काः**—केव्हां झालं ग हें असं ?...डॉक्टर आले होते ना ?

**ताईः**—नाहीं.—डॉक्टर नाहीं आले अजून...म्हणजे हे त्यांना बोलवायला गेले होते, पण डॉक्टर कुठं नाटकाला गेले होते म्हणे. येतील आत्तां.

**आक्काः**—नाटकाला ? आणि अजून ते आले नाहींत ?...तूं ताबडतोब बोलावणं पाठवलं नाहींस त्यांना ?

**ताईः**—तूं मला समजतेस तरी काय ? अगदीं लगेच बोलावणं पाठवलं मी त्यांना. यांनाच विचार हवं तर. पण डॉक्टर काळे घरीं नव्हते.

**आक्काः**—पण मग गांवांतले सगळे डॉक्टर काय मेले होते ? काळे डॉक्टर नव्हते, तर गोरे डॉक्टरना बोलवायचं. म्हणे डॉक्टर नाटकाला गेले होते. बरं तर बरं, नाहींतर भलतंच कांहीं झालं असतं, म्हणजे मग ?

**नानाः**—( त्यांना हंसूं आवरत नाहीं. म्हणून शिंकतात. )

**ताईः**—तूं तरी बरीच आहेस कीं ग. काळे बाबांचे फॅमिली डॉक्टर. जन्मभर काळे डॉक्टरनीं बाबांना औषधं दिलीं. आणि आतां बाबा औषध घेतनासे झाले, तेव्हां दुसऱ्या डॉक्टरना बोलवायचं वाटतं ?

**आक्काः**—आणि तूं तरी बरीच आहेस कीं ग. ऐनवेळीं डॉक्टर नाहीं तर काय त्या डॉक्टरचं लोणचं का घालायचं आहे ?

**ताईः**—तूं मला शहाणपणा शिकवूं नकोस आणखी. बाबा गेल्यावर मग डॉक्टरनं तरी काय केलं असतं ग आणखी ?

**आक्का**:—म्हणे डॉक्टरनं काय केलं असतं ? परवांच आमचे ते शेजारी—जनूभाऊ—गेले—गेले म्हणजे जाणार होते—म्हणजे लोकांनीं त्यांची आशाच सोडली होती—ते गेले म्हणून त्यांच्या घरांत रडारडसुद्धां झाली—आणि मग डॉक्टरनीं त्यांना फिरून जिवंत केलं—

**ताई**:—म्हणे जिवंत केलं ! ( वेडावते. ) माणूस मेल्यावर पुनः जिवंत झाला, तर मग बघायलाच नको.

**आक्का**:—अग, अशा शेंकडों केसेस् झालेल्या आहेत, माहीत आहे ?

**अण्णा**:—असं होतं कधीं कधीं. पण तें एखादा माणूस बुडाला तर. बाबा कांहीं पाण्यांत बुडून गेले नाहींत.

**नाना**:—नाहीं. तशी कांहीं धास्ती नव्हती म्हणा. बाबांना पाण्याचं फारच भय वाटत असे. आणि त्यांना पोहतां पण येत नव्हतं. ( ते हंसण्याचा यत्न करतात. )—

—[ पण बाकी सारे सुतकी चेहेरे करून बसतात. ]

**आक्का**:—काय झालं तें तरी सारं सांग मला, ताई.

**ताई**:—काल रात्रीं किनई बाबा बरेच खुषींत होते.

**नाना**:—म्हणजे अगदीं त्या दिवशींसारखे कीं काय ? मेल्या दिवाळींतच, नाहीं ? स्वारी नाचत नाचत घरांत आली, हातांत दहावीस बाटल्या घेऊन. आणि मग गाण्याच्या बैठकीला काय पण रंग चढला म्हणतां—( हंसतात. )

[ इतर सारे स्तब्ध. आक्का नानांकडे डोळे वटारून पाहते. नानांचा वाक्प्रवाह एकदम थांबतो. ]

**आक्का**:—बरं मग ? पुढं सांग कीं.

**ताई**:—कालच बाबा विमा कंपनीच्या हपीसांत गेले होते...

**नाना**:—पण विम्याचे सारे हप्ते व्यवस्थित भरलेले आहेत ना ? हो—नाहींतर ऑफस व्हायचं सारंच—अन् मग—( आपल्या सखीच्या नेत्रकटाक्षांचं स्मरण होऊन जीभ चावतात. तें वाक्य अर्धवटच राहतं. )

**ताई**:—मग तिथून ते गेले आजीबाईच्या खाणावळींत. काल गुरुवार होता ना ? गुरुवार भजनाचा दिवस. नि मग रात्रीं बरेच उशीरा घरीं आले. घरांत आले ते सरळ माडीवरच गेले. जातांना आम्हांला सांगितलं—'झोंपा आतां. Sweet dreams !'—आणि मग म्हणाले—'Sweet

dreams तुम्हांला कसली म्हणा. Dreams काय ती आम्हांलाच. तुम्ही बेस्यांनो मजा करा. ' ( हळूंच हंसते. )

**नानाः**—( त्यांना हंसणं अनावर होतं. हंसू दाबण्याच्या केंविलवाण्या धडपडींत पुनः जोरानं शिंकतात. ) Good old Man !

**ताईः**—मग थोडया वेळानं मी पाण्याचा तांब्या घेऊन बाबांच्या माडींत गेलें, तर ते अगदीं शांत झोंपले होते—म्हणजे जोरजोरांत घोरत होते; आणि कपडे सगळे तसेच अंगांत होते. डोक्यावरची पगडी, अंगांतलं जाकींट, कोट, हातांतली काठी,—तस्से घोरत पडले होते. मला काय ठाऊक बाई कीं तें घोरणं नव्हतं...ती अखेरची घरघर होती, म्हणून.

**आक्काः**—आणि मग ? कळलं कसं तुला ?

**ताईः**—मी मच्छरदाणी सारखी करीत होतें—तेवढ्यांत त्यांचं घोरणं थांबलं. आणि मग त्यांनीं डोळे दिले फिरवून...मला बाई भीतीच वाटली. मग मी त्यांच्या अंगाला हात लावून पाहिला, तर सारं अंग अगदीं बर्फासारखं थंडगार पडलं होतं. हांका मारून पाहिल्या, पण हूं नाहीं कीं चूं नाहीं. भयानं माझी बोबडीच वळली...आणि मग मी मोठ्यानं किंकाळी फोडली.

**अण्णाः**—हिची किंकाळी ऐकून मी वर गेलों. तर साराच कारभार आटोपला होता.

**ताईः**—आणि मग मला कांहींच आठवत नाहीं—

**अण्णाः**—तुला कसं आठवेल तें ? तुला तेव्हां फिट् आली होती.

**आक्काः**—आणि बाबा गेले होते ?...

**अण्णाः**—मला एक क्षणभर वाटलं—ही पण हातची जाते कीं काय ?

**आक्काः**—बाबा, कसे हो आम्हांला टाकून गेलांत तुम्ही ?

[ दोघी बहिणी रडूं शकतात, हें आत्तां कळून येतें ! ]

**ताईः**—( डोळे पुसून ) हं. आतां काय त्याचं. झालं, गेलं, संपलं.—मग काय आक्का, माडीवर येतेस आधीं ? (क्षणभर थांबून) कां आधीं थोडा चहा घेतेस ?

**आक्काः**—( टेबलावरची चहाची तयारी पाहून ) बऽरं, तूं म्हणतेच आहेस, तर आधीं थोडा चहा घेऊं या.

**ताईः**—( पुनः चहाच्या तयारीला लागते. )

**अण्णाः**—मला वाटतं केसरीकडे आधीं बातमी द्यावी नाहीं.

**नानाः**—गृह्य संस्कार—कळविण्यास वाईट वाटतें कीं आमचे परमपूज्य-

कोण ?—पण कोणाच्या नांवावर ही जाहिरात जाणार आहे ? ( आपली चूक लक्षांत आल्याबरोबर त्यांचा चेहरा पडतो. )

**अण्णाः**—आणखी एखाद्या पेपरमध्यें ही बातमी द्यायची आहे ?

**नानाः**—वाः वाः—चित्रमयजगत्‌ला विसरलांत कीं काय ? केसरींत गृह्यसंस्कार आणि चित्रमयजगत्‌मधें मृत्युलेख—भोंवतालीं मोठी काळी बॉर्डर, वर फोटो आणि खालीं मग—सारं कांहीं—छेः—चित्रमयचा मृत्त्युलेख आपल्याला एखाद्या कंत्राटदाराकडूनच लिहून घ्यायला पाहिजे, बरं का.

**अण्णाः**—कंत्राटदाराकडून ? तें कां ?

**नानाः**—तसं नव्हे, अण्णा. जसे रस्त्यांचे, इमारतींचे कंत्राटदार असतात ना, तसेच मृत्युलेखांचे पण कंत्राटदार असतात !...आणि हें पहा, आपल्या ज्ञातिप्रकाशांत एखादी कविता पण देऊं या......गेले बाबा त्यजुन जगता काय सर्वें रहावें ?

**आक्काः**—काय सर्वें रहावें ? ( वेडावते. ) ...अहाहा ? म्हणे—सर्वें !

**नानाः**—( आवेशानं उभे राहतात. ) निरंकुशाः कवयः...आम्ही कोण म्हणून काय पुसतां, आम्ही असूं लाडके । देवाचे—

**आक्काः**—अहो देवाचे लाडके, गप्प बसायला काय घ्याल जरा ?

**नानाः**—( खालीं कोसळतात. आतां मात्र अवाक्षर तोंडांतून काढायची त्यांची ताकद नाहीं ! )

**आक्काः**—पण काय ग, बाबांच्या या साऱ्या सामानाची आणि वस्तूंची नीट यादी तरी केली आहेस कां तूं ? नाहींतर, मागाहून एकेएक नसत्या भानगडी उत्पन्न व्हायच्या. म्हणून म्हटलं हो. चल, नाहींतर आपण वर जाऊं या. मी तुला मदत करतें. आपण त्यांच्या साऱ्या वस्तूंची व्यवस्थित यादी करूं. पहिल्यांदा त्यांच्या फर्निचरची यादी करूं. हो–तें सगळ्यांत सोपं.

**अण्णाः**—आम्ही त्याची अगोदरच काळजी घेतली आहे. बाकी बाबांचं असं सामान तरी काय आहे एवढं ? दागदागिने तर त्यांनीं तुम्हांला कधींच देऊन टाकले आहेत.

**आक्काः**—कां ? त्यांचं सोन्याचं भारी घड्याळ आहे कीं. बाकी तें त्यांनीं आमच्या बंड्याला देण्याचं कबूल केलं होतं म्हणा !

**ताईः**—काय म्हणालीस ? तुमच्या बंड्याला ? मी तर आजच ऐकतें आहे हो हें.

**आक्का:**—मला तरी खोटं सांगून काय करायचं आहे, बाई. मी आपली खरं तें सांगतें. आमच्याकडे बाबा राहात होते, तेव्हां त्यांनीं आमच्या बंड्याला तें रिस्टवॉच द्यायचं ठरवलं होतं....बाकी आमच्या बंड्यावर बाबांचा भारी जीव हो. आणि पोराला पण आजोबांचा भारी लळा.

**ताई:**—मला यांतलं कांहीं म्हणतां कांहीं माहित नाहीं !

**नाना:**—( एकदम ) आणि त्यांच्या विम्याचं काय म्हणत होतां तुम्हीं ? काल दुपारींच ते विमा कंपनीच्या ऑफिसांत गेले होते, नाहीं का ?

**ताई:**—मला नाहीं बाई माहीत.

**बनी:**—( कोचावरून ताड्कन उठून उभी राहते, आणि आपल्या आईजवळ येऊन ) आई ग, काल दुपारीं आजोबा विम्याकडे गेलेच नव्हते !

**ताई:**—चूप बैस कारटे. तुला काय विमा म्हणजे शेजारची विमल वाटली होय ?... तुला कितीदां सांगितलं कीं मोठीं माणसं बोलत असलीं, म्हणजे लहान मुलांनीं मधें तोंड घालूं नये म्हणून...बाबा काल सारा दिवसभर बाहेरच होते.

**बनी:**—पण आई, काल दिवसभर बाबा आजीबाईकडेच होते. आजीबाईची ठकी काल मला तुळशीबागेत भेटली, तिनंच मला हें सांगितलंन्.

**ताई:**—बऽरंऽग. ते गेले असतील मसणांत. त्याचं काय मोठंसं ?

**नाना:**—त्याचं काय मोठंसं ? वाः वाः ! त्याचंच तर सारं महत्त्व आहे. (जीभ —अजून अंशमात्र असल्यास—चावतात.) बऽरंऽ—ती विमा कंपनी गेली खड्ड्यांत. ...पण त्यांच्या बँक अकाउंटचं काय ? बँकबुक् असेलना त्यांचं ?.. हो... बाकी बँकबुक् कदाचित् त्यांच्या कोटांत सुद्धां असायचं एखाद्या वेळीं—

**आक्का:**—काय ग ताई ?—( एकदम ) बाकी त्याच्या कोटाचे सारे खिसे तूं तपासले असशीलच बहुतेक !

**ताई:**—( या भयंकर आरोपानं तिच्या डोळ्यांसमोर अंधेरी आली आहे. ती कांहींच बोलत नाहीं. )

**आक्का:**—पण तूं बाबांच्या कोटाचे सारे खिसे तपासले असलेस, तरी त्याचा काय तुला एवढा फायदा होणार आहे म्हणा ? चिल्लर कांहीं मिळाली असेल थोडीशी. बँक अकाउंट ते थोडाच तुझ्या नांवावर ट्रान्सफर करणार होते ?

**ताई:**—कां ? आज गेलीं तीन वर्षें ते इथं या माझ्या घरांत रहात होते. त्यांच्यासाठीं मी काय काय खस्ता खाल्या, आणि—असं कसं होईल ? मनुष्य जातांना सुद्धां एवढा दुष्टावा साधतो ?

**आक्काः**—तुझ्याकडे तर ते तीनच वर्षं होते. पण माझ्याकडे ते सव्वा तीन वर्षं होते.

**ताईः**—पण त्या सव्वातीन वर्षांत कधीं एक दिवस तरी तूं सुख लाभूं दिलंस कां त्यांना ? ते तुझ्याकडे होते, तर त्यांना माझ्याकडे पिटाळून लावण्यासाठीं तुझ्या साऱ्या कारवाया चालल्या होत्या. मला माहीत आहे तें सारं. मी कांहीं बोळ्यानं दूध पीत नाहीं आतां !

**अण्णाः**—पण त्यांनीं हिच्या नांवावर बँक अकाउंट ट्रान्सफर केला नसेल कशावरून ?

**आक्काः**—मी सांगतें म्हणून. आमच्या बाबांच्या हातून कवडी सुद्धां सहजासहजीं सुटायची नाहीं कधीं. ते काय आपलं बँकबुक हिच्या हवालीं करतील ?

**ताईः**—( एकदम ) बने, वर जा बघूं आणि बाबांच्या किल्ल्यांचा जुडगा घेऊन ये. पळ.

**बनीः**—( जागची हलत नाहीं. ) पण त्यांच्या किल्ल्या आहेत कुठं ?

**ताईः**—असतील बघ कुठं तरी तिथंच पडलेल्या.

**बनीः**—तिथं म्हणजे कुठं ग आई ?

**ताईः**—किल्ल्या ठेवायचीं तिथं शंभर कां ठिकाणं आहेत ? जरा नीट बघ. असतील तिथंच ड्रेसिंग-टेबलावर—( जीभ चावते ).

**आक्काः**—ड्रेसिंग-टेबलावर ?

**बनीः**—( ती जायला कां तयार नाहीं, याचं खरं कारण आत्तां कळतं. भयानं– ) आजोबांच्या खोलींत ?

**ताईः**—हं.

**बनीः**—आई, मी नाहीं बाई जात.

**ताईः**—नाहीं जात काय ? जा भर्रकन् अन् पटकन्दिशी निघून ये. तिथं कोणीं तुला खाणार कां आहे ?

**बनीः**—( अजून तशीच उभी ! )

**ताईः**—जातेस कीं नाहीं कारटे ? ऊठ.

**बनीः**—( मोठ्या कष्टानें जाते. )

**ताईः**—बँकबुक असलंच तर मिळेल टेबलाच्या खणांत.

**आक्काः**—टेबलाच्या खणांत ?

**नानाः**—कोणत्या टेबलाच्या ? या ? (उठून ड्रेसिंग-टेबलाचं लक्षपूर्वक निरीक्षण करतात.)

**आक्का**: —( आतां ती पण उठते. ) हें ड्रेसिंग-टेबलं तूं कधीं घेतलंस ग ताई ? गेल्या खेपेस मी इथें आलें होतें, तेव्हां कांहीं हें टेबल पाहिल्याचं मला आठवत नाहीं.

[ नाना आणि आक्का दोघेहि टेबल न्याहाळून पाहतात. ]

**ताई**:—यांनीं आणलं तें परवांच. तूं पाहशील कुठून मग ?...अलीकडेच घेतलं आहे हो.

**आक्का**:—छान आहे, नाहीं ? खरंच सुंदर आहे. कुठं लिलावांत कां घेतलं ?

**अण्णा**:—अं...अं...कुठून आणलं ग मीं तें ?

**ताई**:—इश्श. आठवतसुद्धां नाहीं का मेलं एवढं. त्या बोहऱ्याच्या लिलांवांत नाहीं कां आपण विकत घेतलं तें ?

**नाना**:—अं...अं...( तुच्छतेनं ) सेकंडहँड. सारा चोरबाजारांतला माल.

**आक्का**:—कांहींतरीच बोलूं नका. अशा सुंदर वस्तू चोरबाजारांतूनच आणाव्या लागतात ! बघा—या तसबिरी बघा साऱ्या ! !

[ बनी येते. भयंकर भ्यायलेली. आंत आल्याबरोबर आधीं ती दरवाजा बंद करते. ]

**बनी**:—( भीतीच्या स्वरांत, आईला बिलगुन ) आई ! ए आई !

**ताई**:—काय ? काय झालं बाळ ?

**बनी**:—आई...मी गेलें तेव्हां—किनई—( पुनः स्तब्ध ! )

**ताई**:—आतां सांगतेस नीट का देऊं एक ठेवून ?

**बनी**:—किनई मी गेले तेव्हां आजोबा पलंगावर उठून बसत होते !

**नाना**:—काय ? काय म्हणालीस ?

**ताई**:—काय, म्हणतेस काय तूं कारटे ?

**बनी**:—( संथपणानं ) मी वर गेलें...तर आजोबा किनई पलंगावर उठून बसत होते ! !

**आक्का**:—काय, तुला वेड लागलं आहे कीं काय ?

**ताई**—( गंभीरपणानं ) काय सांगते आहेस तूं, बाळ. तुझे आजोबा देवाकडे गेले, हें तुला माहीत का नाहीं ?

**बनी**:—मग कदाचित् ते देवाकडे जायचीच तयारी करीत असतील. बरोबर...म्हणूनच उठत होते ते ! ! !

**ताई**:—गप्प बैस कारटे !

[ खोलींतले सारेजण विसमयचकित झाले आहेत. क्षणभर कोणींच कांहीं बोलत नाहीं. विलक्षण, चमत्कारिक स्तब्धता. ]

**आक्का:**—ताई, तूं एकदां वर जाऊन स्वतःच पाहून ये बघूं.

**ताई:**—( उसन्या अवसानानं ) मग मीच जातें कशी आतां. ( अण्णांना ) चला हो.

**अण्णा:**—( गर्भगळित ! )

**नाना:**—स्...स्...( एकदम ) ऐका जरा.

[ सर्वजण नानांकडे पाहतात. ]

**नाना:**—( पुनः ) ऐकलंत ?

[ ते सर्वजण उजव्या बाजूच्या दाराकडे बघतात. जिन्यावर पावलांचा संथ, गंभीर आवाज ऐकूं येतो. मग हळूंच दार उघडतं. दारांत म्हातारबुवांचं दर्शन होतं. चुण्या पडलेलं पण स्वच्छ धोतर, वर मलमलचा तलम सदरा. दोन्ही हातांत शर्ट, जाकीट, कोट, पगडी, काठी इत्यादि वस्तु. म्हाताऱ्याचं वयोमान खरोखरच ऐंशीच्या जवळपास—निदान सत्तरीच्या पलीकडे—आहे. पण वृद्धपणाबरोबर येणारी दुर्बलता त्यांच्या देहांत नाहीं. शरीर कणखर, बांधा भरदार, ताठ. डोळ्यांत मिष्कीलपणाची खेळकर चमक. हेच ते प्रसिद्ध आजोबा.—किंवा त्यांचं भूत असेल कदाचित् ! ]

**आजोबा:**—काय बनूताई, कसं काय ? ठीक आहे ना ? ( नंतर आक्काकडे आणि मग त्यांच्या यजमानांकडे त्यांचं लक्ष जातं. ) काय मंडळी, तुम्ही सारेजण केव्हां आलांत ? काय आक्काबाई, तुमचा फेरा इकडे कोणीकडे ?

[ बोलतां बोलतां ते ज्यांच्याजवळ जातात, ते ते भयानं मागंमागं सरतात. अण्णा मट्कन आरामखुर्चीवर बसतात. ]

**ताई:**—( अखेरीस धीर करून ) कोण ? आजोबा ? तुम्हींच का ते ? ( हातानं त्यांना चाचपून पाहाते. आतां तिची खात्री पटली आहे ! )

**आजोबा:**—होय. मीच तो. कां ?—आणि दूर हो. आंधळी कोशिंबीर खेळायला आतां तुझ्या एवढा लहान का आहे मी ? अं ?

**ताई:**—( हळूंच ) होय. बाबाच तुम्ही.

**नाना:**—( हळूंच ) यांत काय संशय ?

**आजोबा:**—( या कुजबुजीनें चिडून ) अरे काय पोरांनो, झालं आहे तरी काय तुम्हांला सगळ्यांना ? ( आक्काला ) आणि काय ग भवाने, किती वर्षांनीं आज फिरकलीस तूं इकडे ? आपला बाप अजून जिवंत आहे, याची शुद्ध तरी होती का तुला ? आणि आतां आलीस ती आलीस, पण अशी सुतकी कळा कां ग बाई तुझ्या चेहऱ्यावर ?

**आक्का**:—( केस आणि वस्त्र सांवरीत ) कुठं ?...काय ?...कांहीं नाहीं ?...तुम्ही आज इतक्या उशीरां खालीं आलांत कीं नाहीं, म्हणून आम्हांला सर्वांनाच नवल वाटलं हो.—पण आतां तुमची प्रकृति सध्यां बरी आहे ना ?

**आजोबा**:—अं ? काय म्हणालीस ? अलीकडे मला जरा कमी ऐकायला येतं.

**आक्का**:—नाहीं, म्हटलं तुमची प्रकृती बरी आहे ना ?

**आजोबा**:—म्हणजे ? मी आजारी होतों कीं काय ? मला काय धाड भरंली आहे आजारी पडायला ? चांगला धडधाकट आहे मी. तुम्ही सारेजण माझ्या-आधीं ओंकारेश्वरीं जाऊन पडाल; काय समजलां आहांत, गुलामांनो ? आतां हा अण्णा—आणि हा नाना—काडी पहिलवान आहेत बेटे एकाहून एक. ( हातांतलं सामान मधल्या टेबलावर टाकून आपल्या आरामखुर्चीकडे वळतात.—तावडतोब अण्णा आरामखुर्ची रिकामी करून देतात.—आणि मग आजोबा आरामखुर्चीवर. आरामशीर पहुडतात. )—आणि काय ग ?...( ताईला ) माझ्या खडावा कुठं आहेत ? ( आरामखुर्चीच्या पायाशीं प्रथम, मग आसपास पाहतात. )

**ताई**:—( गोंधळून ) आतां तुम्ही तुमच्या खडावा कुठं टाकल्या, तें मला बाई काय माहीत ? असतील त्या कोपऱ्यांत—

**आजोबा**—कुठं ? मला कुठं दिसत नाहींत त्या ? ( तेवढ्यांत त्यांचं लक्ष अण्णां-कडे वळतं.—अण्णा हळूंच पायांतून खडावा काढून ठेवण्याच्या धडपडींत मग्न असतात ! ) आणि काय रे, माझ्या खडावा तूं घातल्या आहेस कीं काय ?

**ताई**:—( तावडतोब, घाईनं ) नाहीं, मीच सांगितलंन् हो त्यांना तुमच्या खडावा घालायला....विसरलेंच बाई अगदीं....म्हटलं वापरून वापरून सैल तरी होतील जराशा.

**आजोबा**:—( मोठ्यानं हंसत ) अग, वापरून वापरून सैल व्हायला त्या कोल्हापुरी वहाणा का आहेत ?...अं. आण त्या खडावा इकडे.

**ताई**:—( मुकाट्यानं खडावा नेऊन देते ! )

**आजोबा**:—( खडावा पायांत घालतात ! ! )

**आक्का**:—( आपल्या पतिराजांच्या कानांत, हळूच ) काय बाई एक एक माणसं असतात तरी ! बाबा जायची तरी निदान वाट पहायची !

[ अण्णा खिडकीवरचे पडदे सरकवून खिडकी उघडतात. बनी तेवढ्यांत आराम खुर्चीच्या हातावर जाऊन बसते. ]

**बनीः**—आजोबा, तुम्ही किनई गेलां नाहींत, हें कित्ति कित्ति चांगलं झालं, नाहीं ?
**ताईः**—( संतापानं ) बने, जीभ फार सैलशी सोडली आहेस ?
**आजोबाः**—काय ? काय म्हणालीस तूं बने ?...कोण गेलं नाहीं ? काय भानगड आहे ही सारी ?
**ताईः**—कांहीं नाहीं, ती म्हणते आहे कीं तुम्ही आज सकाळीं लौकर उठून बाहेर गेलां नाहींत, हें फार बरं झालं. हे पाहुणे आले आहेत ना आज घरीं, म्हणून हो ? ( पाहुणे म्हणजे मेव्हणे. )
**आजोबाः**—असं असं. ठीक. ठीक. बने, तूं फार शहाणी मुलगी आहेस.
**बनीः**—( लगेच लाडांत येऊन ) आहेच मुळीं.
**ताईः**—आहेच माझी बाळ गुणाची तशी. ( आक्काला ) बाबांचा किनई पोरीवर भारीच जीव आहे हो.
**आक्काः**—( ताईला ) आमच्या बंड्यावर पण त्यांचा असाच जीव आहे.
**ताईः**—( आक्काला एकीकडे हळूंच ) बरी आठवण केलीस ! तुझ्या बंड्याला बाबा त्यांचं सोन्याचं घड्याळ देणार होते, नाहीं का ? विचार पाहूं आतां त्यांना.
**आक्काः**—( लगेच ) छेः छेः ( घाबऱ्या घाबऱ्या ) नको. नको. आत्तां नको.
**आजोबाः**—अरे, तुम्ही सारे असे स्तब्ध कां ? कांहीं बोला कीं, अं ? ( आत्तां अण्णांच्या पोशाखाकडे त्यांचं प्रथम लक्ष जातं ! ) आणि काय रे, ही काय नवीनच फॅशन काढली आहेस तूं आज ? ही लुंगी—आणि भंग्यासारखं डोक्याला काय गुंडाळलं आहेस तें ? महात्माजींनीं हात ठेवला वाटतं तुझ्या डोक्यावर —कां ओंकारेश्वरीं जायच्या तयारींत आहेस ?—कोण, गेलं कोण बाबा ? अरे, बोल कीं—आपले रावबहादुर दाते गेले कीं काय ?
**ताईः**—छेः छेः बाबा, तुमचं आपलं भलतंच कांहीं तरी,—यांच्या हपीसांतले कोणी गेले वाटतं आज पहांटे, म्हणून हे त्यांना ओंकारेश्वरीं पोंचवायला जायला निघाले आहेत हो.
**आजोबाः**—यांच्या हपीसांतले ? ते कोण ?...कोण रे अण्णा ? अरे बोल कीं.
**अण्णाः**—अंः अंः
**नानाः**—( हळूच ) सांगा कांहींतरी आतां. ( मोठ्यानं सुचवतात ) दादासाहेब—
**ताईः**—रावसाहेब—( दुसरी सूचना. )
**अण्णाः**—( शेवटीं मनाचा धडा करून ) रावसाहेब...

**आजोबा:**—कोण? रावसाहेब?...अरे आमचा भैया देसाई कीं काय?...आणि तो केव्हां गेला बाबा? काल रात्रीं तर आम्ही पर्वतीला बरोबरच गेलों होतों. चला—मग मलाहि यायला पाहिजे आतां तुझ्याबरोबर. बरं झालं तूं मला सांगितलंस तें. बरोबरच जाऊं या तर ओंकारेश्वरीं.

**अण्णा:**—( गोंधळून ) रावसाहेब...रावसाहेब...देसाई नाहींत कांहीं.

**आजोबा:**—देसाई नाहीं ना आमचा. मग मरूं दे कोण तुझा रावसाहेब असेल तो.—मला वाटलं, आजची सकाळ फुकट जाते कीं काय?...अग ताई, मला चहा द्यायचा नाहीं वाटतं आज?

**ताई:**—इश्श! बोलण्याच्या नादांत विसरलेंच कीं. देतें हो.

**आजोबा:**—(चहा येतो आहे, तोंपर्यंत स्टुलावरचा पुडा सहज सोडतात) हे काय?—जिलबी. वाः वाः मौज आहे बुवा. ( वास घेऊन ) अरे वाः जिलबी पण आमच्या रंगीकडची दिसते आहे! ( अण्णांना ) काय? खरं ना?

**अण्णा:**—( खालच्या मानेनें ) होय बाबा. आजीबाईकडचीच आहे ती.... तुम्हांला आवडते ना भारी, म्हणून मी सकाळीं मुद्दाम जाऊन घेऊन आलों तुमच्यासाठीं.

**आजोबा**—अरे वाः आमच्यावर मोठीच मेहेरबानी झाली म्हणायची मग.

**नाना:**—अरे वाः तुम्हांला तर अगदीं सडकून भूक लागलेली दिसते आहे.

**आजोबा:**—अं? ( खात खात ) काय म्हणालास? जरा मोठ्यानं बोल कीं.

**नाना:**—नाहीं. म्हटलं सध्यां तुमची प्रकृती अशी—

**आजोबा:**—अशी? म्हणजे कशी? मला काय झालंय असं?—आतां काल रात्रीं थोडंसं...नाहीं थोडीशी...जरा जास्तच झाली होती म्हणा—

**नाना:**—काय? काय म्हणालांत?

**आजोबा:**—नाहीं. तसं कांहीं नाहीं. काल रात्रीं माझी झोंप जरा चाळवली होती.

**ताई:**—( दचकून ) काय?

**अण्णा:**—( दचकून ) काय म्हणालांत?

**आजोबा:**—कांहीं नाहीं. म्हटलं काल माझं डोकं जरा ठिकाणावर नव्हतं.—डोकंच काय, हातपाय सुद्धां. डोकं, हात, पाय, काल बेटे कांहीं कामच देत नव्हते!

**नाना:**—आणि डोळे?—

**आक्का:**—आणि कान?—

**आजोबाः**—कोण जाणे. मला आतां नीटसं कांहींच आठवत नाहीं.

**ताईः**—झोंपेंत कांहीं झालं, तर आठवेल तरी कसं? तुमचं आपलं कांहींतरीच.

**आजोबाः**—पण काल रात्रीं मला झोंप मात्र मुळींच आली नाहीं. ( डोळे चोळीत ) अजून बेटे डोळे चुरचुरताहेत.

**आक्काः**—बाबा, आतां अगदीं नीट आठवून सागा अं. काल रात्रीं ही ताई किंवा तिचे हे—केव्हां तुमच्या खोलींत आले होते?

**आजोबाः**—( डोकं खाजवीत ) हा आणि ही—ही आणि हा—

**ताईः**—काय चहाटळपणा लावलास आहेस ग?—कांहीं नाहीं हो बाबा—

**आजोबा?**—( एकदम कसल्यातरी आकस्मिक आठवणीनं ) ए—आणि अहो—( हें ताईला आणि तिच्या ह्यांना! ) माझ्या खोलींतलं ड्रेसिंग टेबल कुठं नेऊन टाकलंत? अडगळीच्या खोलींत?

**ताईः**—( स्तब्ध! )

**अण्णाः**—( निःस्तब्ध!!—ते तरी काय बोलणार मग? )

**आजोबाः**—काय हो सद्गृहस्थ, आणि अहो बाईसाहेब, ऐकूं येतं आहे ना—मी काय विचारतों आहे तें?

**आक्काः**—कोणतं टेबल बाबा? ( जणूं काय तिला माहितच नाहीं! )

**आजोबाः**—कोणतं म्हणजे? माझं. परवांच मीं आणलं तें...

**आक्काः**—( ड्रेसिंग-टेबलाकडे बोट दाखवून ) तें कां?

**आजोबाः**—( आत्तां प्रथमच त्यांचं लक्ष टेबलाकडे जातं. ) अरेच्या. अरे तेंच हे. पण हें बेटं इथं खालीं कसं आलं बुवा?

[ एवढ्यांत भिंतीवरच्या घड्याळांत दहाचे ठोके पडतात. सर्वजण एडकदम त्या घड्याळाकडे बघतात. क्षणभर विचित्र शांतता. ]

**आजोबाः**—अरेच्या मारी, हें घड्याळ पण माझंच आहे कीं! माझ्या खोलींतल्या साऱ्याच वस्तूंना काल रात्रींत पाय फुटले कीं काय? भुताटकीनं एका रात्रींत हें घर झपाटलं तर नाहीं?

**नानाः**—हें पहा आजोबा—

**आक्काः**—मी सांगतें बाबा तुम्हांला सगळं! भुताटकी नाहीं नि कांहीं नाहीं. अगदीं तुमच्या डोळ्यांदेखत तुमच्या वस्तूंवर दरोडा पडला आहे. चोर, भामटे मेले!

**ताईः**—चूप बैस.

**आक्का**:—तूंच चूप बैस आतां. मला धाक दाखवतेस काय ?

**ताई**:—तुला वेड तर नाहीं लागलं ?

**आक्का**:—चूप बैस म्हणते ना ! दम कोणाला देते आहेस एवढा ? ( अण्णांना ) आणि काय हो, तुम्ही तरी असे अगदीं बाईलबुद्धे कसे ? जनाची नाहीं तर नाहीं, पण निदान मनाची तरी थोडी लाज वाटायला पाहिजे होती तुम्हांला. दरोडेखोर मेले !

**ताई**:—( उभी राहून, दरडावणीच्या स्वरांत ) तुझी जीभ फारच सैल सुटली आहे हं आतां. ( संतापानं ) कोणाच्या घरांत तूं ही बडबड चालवली आहेस ग म्हाळसे ?

**अण्णा**:—( उभे राहून, ताईला ) ऐक जरा. ( आक्काला ) आणि काय हो, तुम्ही एकदम अशा हमरीतुमरीवर आलांत, असं आम्ही काय केलं हो ?

**नाना**:—( उभे राहून ) काय केलं ? काय केलं नाहीं, तें विचारा. माझी बायको तुम्हाला जाब विचारते आहे त्याचं आधीं सरळ उत्तर द्या, मिस्टर.

**ताई**:—( ओरडून ) जाब विचारायचा आहे ना हिला ? ( आक्काचे दंड धरून ओढते. ) आधीं माझ्या घराबाहेर व्हा आणि मग विचारा काय जाब विचारायचे असतील ते. चला. व्हा बाहेर आधीं. हं.

**आजोबा**:—( उभे राहून, टेबलावर जोरानं मूठ आपटून ) अरे पण काय ही भानगड तरी काय आहे सारी ?—तुम्ही सारे असे लठ्ठालठ्ठी कां करतां आहांत ?—काय झालं ग आक्का ?

**आक्का**:—( उभी राहून ) मी सांगतें हो बाबा तुम्हाला सगळं. तुमच्यावर असा दरोडा पडलेला मी अशी उघडया डोळ्यांनीं पाहणार नाहीं.

**आजोबा**:—अग कशाचा दरोडा ? कोण कोणावर दरोडा घालतो आहे ?

**आक्का**:—हे—हे दरोडेखोर—( म्हणजे ताई आणि श्रीयुत ताई. ) तुमच्या वस्तूं-वर तुमच्या डोळ्यांदेखत दरोडा घालताहेत.

**नाना**:—घालताहेत ? हा वर्तमानकाळ झाला. या दरोडयाचा कधींच भूतकाळ झाला आहे ! दरोडा घातला म्हण...घातला ! !...

**आजोबा**:—कोण दरोडेखोर ?...ताई ?...आणि अण्णा ?

**आक्का**:—हो. हो. ताई आणि तिचे हे...यांनींच तुमच्या ड्रेसिंग-टेबलावर दरोडा घातला. हेच ते चोर, दरोडेखोर ! आणि तुमचं भिंतीवरचं हें घडयाळ पण यांनींच रातोरात चोरलं. मध्यरात्रीच्या काळोखांत हे चोरासारखे

तुमच्या खोलींत घुसले...आणि तुम्ही गेलांत असं वाटून यांनीं... या चोरांनीं...

**ताई**:—( दांत ओंठ खात ) चूप !

**अण्णा**:—( शांतपणानं ) कां उगाच जीभ शिणवतां आहांत ?

**आक्का**:—नाहीं. मी आतां तुमच्या दटावणीला भीक घालणार नाहीं. तुम्ही गेलांत असं वाटून या चोरांनीं—तुम्ही गेल्यावर—

**आजोबा**:—कोण ?—कोण गेल्यावर ?

**आक्का**:—तुम्ही ! तुम्ही गेल्यावर—

**आजोबा**:—मी ?...मी गेल्यावर ?...मी कुठं गेलों होतों ?...कुठं गेल्या-वर ?...काय घोंटाळा आहे सारा ?

**आक्का**:—अहो तुम्ही—तुम्ही गेलांत. म्हणजे मेलांत. कळलं ?

**आजोबा**:—मी ?...मी मेलों ?...पण मी कुठें मेलों आहे ? मी तर चांगला सव्वा हात तुरा लाऊन जिवंत आहे कीं ! ( हरे राम ! काय ब्रह्मघोंटाळा झाला आहे, देव जाणे. )

**आक्का**:—तुम्ही जिवंत आहांत हो. कबूल आहे. पण यांची ( म्हणजे ताईची नि अण्णांची ) तशी खात्री करून द्या कीं. यांना वाटलं कीं तुम्ही मेलांत !

**आजोबा**:—( आतां त्यांच्या डोक्यांत प्रकाश पडतो आहे ! ) अस्सं. अस्सं. ( हंसतात. ताईकडे आणि अण्णांकडे आळीपाळीनें बघतात. ) तुम्हांला वाटलं कीं मी गेलों...मेलों ( मोठ्यानं खदखदून हंसतात. ) छान. छान.—पण मी मेलों नाहीं....मेला तो मी नव्हे. मी—हा गणपतराव चंद्रचूड—अजून जिवंत आहे...( जिलबी फस्त करतात ! ) ए, ( ताईला ) ती किटली कर बघूं इकडे.

**ताई**:—( हुंदके देत, डोळे चोळीत, किटलींतून त्यांच्या कपांत चहा ओतते, आणि कप त्यांच्या हातांत देते. मग इतर सर्वांचे कप भरून सर्वांना चहा देते, एकीकडे हुंदके उसासे, निःश्वास, रडणं, डोळे पुसणं चालूंच आहे. ) बाबा—

**आजोबा**:—( उपरोधिक ) काय बाळ ?...( जरा वेळानं ) पोरींनो, तुम्ही माझ्या जिंदगीची वांटणी आरंभलींत, पण निदान मला एकदां नीट मरायची तरी संधी द्यायची होतींत ? खुळ्या कुठल्या.

**आक्का**:—वाः बाबा, असं कांहीं चालायचं नाहीं हं. माझा कांहीं संबंध नाहीं या भानगडींत. आणि वांटणी कसली ती ? हे हेच ( म्हणजे ताई—अण्णा ) आपली घरभरणी करीत होते तुमच्या वस्तू चोरून.

**आजोबाः**—( ताईला ) बाकी ही पोरटी पहिल्यापासूनच भारी बिलंदर. अगदीं लहानपणापासूनच हिचं हें असं आहे. खाऊचा स्वतःचा वांटा फस्त करून पुनः इतरांचा वांटा भांडून घशांत घालायला पुन्हा तयार...काय ग, तुला काय वाटलं, तुला तुझी वांटणी बरोबर मिळाली नाहीं, म्हणून ? माझ्या वुइल्वर तुझा विश्वास कां नव्हता ?

**नानाः**—म्हणजे ? तुम्ही वुइल् केलं आहे ?

**आजोबाः**—म्हणजे ?...मी कांहीं आतां बोंडल्यानं दुध पीत नाहीं.—अजून मी पुरता जगाबाहेर गेलोंसुद्धां नाहीं—तेवढ्यांत तुम्ही एकमेकांचे गळे कापायला निघालां आहांत ? हें सारं असं होणार, हें मला माहीतच होतं. तुम्ही दोघी लहानपणीं आपापल्या वांट्यांसाठीं एकमेकींच्या उरावर बसायला लागलांत, तेव्हांपासून मी माझं वुइल् करून ठेवलेलं आहे.

**सर्वः**—( आजोबांकडे स्तिमित दृष्टीनें पहातात. )

**आजोबाः**—खोटं वाटतं तुम्हांला ? या ड्रेसिंग-टेबलाच्या मधल्या खणांत माझं वुइल् आहे. बघा हवं तर.

**आक्काः**—( कुतूहलानें ) बघूं ? मग दाखवाच तर.

**ताईः**—( कुतूहलानें ) पाहूं पाहूं.

**नानाः**—नाहीं पण दाखवाना एकदां.

**आजोबाः**—पण आतां काय त्याचं ? त्या वुइल्चा आतां भूतकाळ झाला आहे, नाना ! आतां मी तें वुइल् फाडून टाकणार आहे....दुसरं वुइल् करणार आहे आतां मी.

**ताईः**—( रडत, हुंदके देत, डोळे चोळीत ) पण बाबा, मग...मग...माझं कसं होणार हो ? देवा, मी आतां काय करूं ?

**आजोबाः**—ती किटली जरा इकडे कर .. आणि दूध पण....अस्सं...

**ताईः**—( तसं करते. )

**आजोबाः**—हें पहा पोरींनो, तुम्ही दोघी कशाहि असलांत, तरी मला सारख्याच आहांत.—माझ्याच मुली आहांत ना तुम्ही दोघी ?...( विचारपूर्वक) तुझी आई गेल्यापासून कांहीं दिवस मी तुझ्या जवळ राहिलों आक्का, आणि ताई, तुझ्याजवळ पण कांहीं दिवस राहिलों....आतां मी नवीन वुइल् करणार आहे. जिच्या जवळ मी अखेरीस राहीन, तिला मी गेल्यावर माझ्या साऱ्या वस्तू मिळतील;—असं नवं मृत्युपत्र मी करून ठेवीनं. मग तर

झालं ?—आतां तर तुम्हांला दोघींनाहि तक्रार करायला कांहीं जागा नाहीं ना ?

**नाना**:—वाः वाः ही तर गोवा लॉटरीच झाली कीं.

**आक्का**:—मग आतां यापुढें कोणाजवळ रहायचा विचार आहे तुमचा ?

**आजोबा**:—( चहाचा दुसरा कप संपवून ) जरा सबूरीनं घे पोरी. सारं कांहीं सावकाश सांगणार आहे मी.

**आक्का**:—( लाडिकपणानं ) पण बाबा, कित्ति कित्ति दिवसांत तुम्ही आमच्याकडे रहायला आलेलां नाहींत. आतां चलाना आमच्या घरीं. अशी फक्कड बरदास्त ठेवते तुमची कीं यंव.

**ताई**:—नाहीं. बाबा इथें आहेत तेच बरे आहेत. त्यांना इथंच बरं वाटतं, नाहीं बाबा ? तुझ्याकडे त्यांना काय सुख लागणार, तें दिसतंच आहे. म्हणून तर ते इतके दिवस माझ्याकडे राहिले.

**आक्का**:—आजची तुझी ही करणी पाहिल्यावर बाबा यापुढं तुझ्याकडे राहतील, असं वाटलं तरी कसं तुला ताई ?

**आजोबा**:—मग काय आक्काबाई, तुमच्याकडे नेणार तर तुम्ही आम्हांला ?

**आक्का**:—असं हो काय करतां, बाबा ? चला, आज दुपारच्याच गाडीनं आपण निघूं या, अं ?

**आजोबा**:—आणि ताईसाहेब, तुमचं काय म्हणणं आहे यावर ?

**ताई**:—माझं कांहीं म्हणणं नाहीं. मला फक्त एवढंच तुम्हांला सांगायचं आहे बाबा कीं अलीकडे आक्कामधें बराच फरक झालेला दिसतो आहे. ( उठून ) मग सांगतेंच तर तुम्हांला सारं. या आक्काबाई माझ्याशीं कां भांडल्या, ठाऊक आहे तुम्हांला ?

**आक्का**:—आतां मागचं कांहीं उकरुन काढूं नकोस हं, ताई. शपथ आहे माझी तुला, बघ.

**ताई**:—तें कांहीं नाहीं. बाबा माझ्याजवळ जर राहणार नसतील, तर ते तुझ्याकडे पण येणार नाहींत. माझं ऐका हो बाबा—ही आक्का यापुढें तुम्हांला आपल्या घरीं बोलवायला सुद्धां तयार नव्हती. तुमचं कधीं तोंड सुद्धां पाहणार नव्हती ही बया. तुम्हाला ती अगदीं कंटाळली होती. गेल्या उन्हाळ्यांत यांनीं रजा घेतली आणि आम्हीं बंगलोरला जायला निघालों होतों, आठवतं ? तेव्हां मी हिला सहज लिहीलं कीं कांहीं दिवस तूं बाबांना

बोलावून घे. तर या आक्काबाईनीं मला काय उत्तर दिलंन्, माहीत आहे? मी बाबांचं तोंड पाहणार नाहीं यापुढें—असं हिनं मला स्पष्ट कळवलं. आणि मग आम्ही बंगलोरला गेलोंच नाहीं!

**आजोबा**:—झालं तुमचं दोघींचं पुराण. एकूण काय, तुम्हां दोघींनाही मी मनापासून नको आहे, असंच ना?

**ताई**:—असं हो काय करतां बाबा? माझ्या हातून चूक झाली असेल, नाहीं म्हणत नाहीं मी. पण मीहि मनुष्यच आहे. आणि चूक कोणाच्या हातून होत नाहीं?

**आक्का**:—माझं पण तेंच म्हणणं आहे, बाबा!

**आजोबा**:—आतां तुमचं दोघींचंहि तेंच म्हणणं आहे, नाहीं? ठीक, आणि तरीसुद्धां तुम्हांला दोघींनाहि मी नकोसा झालों होतों, असंच कीं नाहीं?

**ताई**:—असं हो काय करतां बाबा?
**आक्का**:—असं हो काय करतां बाबा? } ( एकदम. एकाच सतारीच्या दोन तारा )

**आजोबा**:—आणि आतां तुम्हां दोघींनाही मी एकदम हवा हवासा झालों आहे, नाहीं? क्षणार्धांत हा असा चमत्कार कां घडून आला?...माहीत आहे?...सांगतोंच तर मी तुम्हांला.—याला याला कारण पैसा. माझ्या पैशानं तुम्हांला दोघींनाहि चकवलं. आणि तुम्हाला दोघींना नकोसा वाटणारा मी एकदम हवाहवासा झालों! तुम्हाला खरोखर मी नको आहे.—तुम्हांला हवा आहे माझा पैसा. खरं कीं नाहीं? असंच ना? मग ज्यांना मी नको आहे, त्यांच्यावर उगीचच कशाला माझा भार घालूं मी? ज्या कोणाला मी खरोखरच हवा असेन, तिकडेच जाईन मी.

**नाना**:—पण तें जमणार कसं? या दोघींपैकीं कोणाजवळ तरी तुम्हाला रहायलाच पाहिजे!

**आजोबा**:—आहे...म्हटलं अजून बाळ बोललं कसं नाहीं?...जीते रहो पट्ठे... पण मी त्याचीहि व्यवस्था करून बसलों आहे. उद्यांच्या दिवसांत मी एकंदर तीन गोष्टी करणार आहे. एक, वकिलाकडे जाऊन वुईल् बदलून घेणार; दोन, माझा विमा असाइन करणार; आणि तीन, संध्याकाळीं मंगल कार्यालयांत चतुर्भुज होणार.

**अण्णा**:—काय?
**नाना**:—काय म्हणालांत? } ( यांना वेडतर नाहीं लागलं, अशा आविर्भावानं. )

**ताई**:—?

**आक्का**:—?

[ क्षणभर विलक्षण शांतता. कोणींच बोलत नाहीं. आश्चर्याचा भर ओसरल्यावर ]—

**नाना**:—चतुर्भुज होणार? कोणत्या कुमारिकेचा गळा कापणार आहांत आतां?

**आक्का**:—( वटारलेल्या डोळ्यांनीं नवऱ्याला दाबण्याचा यत्न करते. )

**नाना**:—( सुधारण्याचा निष्फल यत्न करीत ) नाही, म्हटलं—गळ्यांत माळ घालणार?

**आजोबा**:—सांगतों कीं तेंहि.—शाळकरी पोरांसारखा मी कांहीं लाजणार नाहीं माझ्या बायकोचं नांव घ्यायला! तिचं नांव—गंगाभागीरथी रंगूबाई!

**सर्व**:—( आश्चर्याचा आणखी एक प्रचंड धक्का! ) कोण?...रंगूबाई?... खाणावळवाली?

**आजोबा**:—हो. रंगूबाई.—खाणावळवाली....गंगाभागीरथी रंगूबाई. कां? आश्चर्य वाटलं तुम्हांला? तुमच्यापेक्षां ती बरी—लाखपटींनीं. कधींपासून ठरलं होतं आमचं. नाहींतरी तुम्हांला मी नकोच होतों! आणि रंगीला मी हवा होतों!!...या मंडळी, सारीजणं उद्यां गोरजमुहूर्तावर जरूर मंगल-कार्यालयांत या! ( हें सारं वरचं भाषण चालू असतांना ते बाहेर जाण्याचा पोषाख चढवीत असतात.—पगडी उपरणं, जाकीट, कोट....शेवटीं हातांत काठी घेऊन ) अच्छा!—नाहीं.—तुम्ही मंडळीअलीकडे बाय् बाय् म्हणतां, नाहीं का?—कां चीरीओ? अच्छा!—नाहीं. चुकलों....बाय् बाय्. (बाहेरचा दरवाजा उघडीत ) आणि हें पहा ताई, तूं तें ड्रेसिंग टेबल खालीं आणलंस ना, तें बरं केलंस; बरं का? आतां तें टेबल रंगीकडे न्यावंच लागेल!—तेवढाच त्रास वाचला....हो..वरुन खालीं आणायची कटकट मिटली! ( दरवाजांतून बाहेर पडतांना, रस्त्याकडे पाहून हात जोडतात. ) या, या, मंडळी...या रावबहादुर.—या, रावसाहेब. तुम्ही पण?...अलभ्य लाभ! अलभ्य लाभ!! या....या....असे या....नमस्कार!...नमस्कार!! ( असं म्हणत म्हणत रस्तापार होतात. )

[ आणि त्याचवेळीं दारांतून हरतऱ्हेची मंडळी आंत येतात. सर्वजण ओंकारेश्वराच्या युनिफॉर्ममधें—कमरेस पंचा, डोकीस उपरणं.—दारांतून आंत येणारांच्या आणि आंतून, दरवाजाकडे बघणाऱ्यांच्या चेहऱ्यांवर स्तिमित आश्चर्याचा आविष्कार. ]

**नाना आणि बनी**:—अच्छा...बाय् बाय्... चीरीओ!

आणि मग—

पडदा.

# नवभारत प्रकाशन—बालवाङ्मय

### धर्मानंद कोसंबी

वेडा इवान ०-६-०

### कु. अनसूया काटदरे

नशीबवान् मुलगा ०-३-०

### माधव केशव काटदरे

डोंगरांतला काका ०-३-०
पऱ्यांची देणगी ०-३-०
सांजवातीचे वेळीं ०-३-०
गाढव जांवई ०-४-०
शालिवाहनाची कथा ०-३-०
सोनसांखळी ०-३-०
तिघे प्रवासी ०-३-०
गोड गीत ( कवि **माधव** ) ०-४-०
तीन रणयोद्धे ०-४-६
तीन लढाऊ प्राणी ०-३-०

### ग. पां परचुरे

मैत्रिणी ०-४-०

### वि. स. गवाणकर

रामायण महाभारतांतील सुरस गोष्टी ०-३-०
महाराष्ट्राच्या इतिहासांतील सुरस गोष्टी ०-३-०

### जोडाक्षर विरहित

काळा-काळा ०-२-०
गमती-जमती ०-२-०
उंदीर-नवरा ०-२-०
खेड्यांतील-जमती ०-२-०

### बाळ ओझरकर

पंच कन्या ०-३-०
पांच बाळें ०-४-६

### पु. बा. कुळकर्णी

मुलें पळविणारी टोळी ! ०-३-०

### एल. व्ही. भावे

सुबोध संवाद ०-४-०

---

वरील सर्व पुस्तकें मुंबई व मध्यप्रांत सरकारनें मंजूर केलेलीं आहेत.

---

### राजकवि **यशवंत**

दरोडेखोर ? छे देवदूत ! ०-६-०

### वि. स. गवाणकर

सुबोध भूगोल ( इ. दुसरी ) ०-४-०
सुबोध भूगोल ( इ. तिसरी ) ०-५-०
जगाचा जन्म ०-३-०

### भि. अ. परब

अर्थसुबोधिनी ०-६-०

### तु. ता. सावंत

बाबू ०-३-०

### पिरोज आनंदकर

वेणीमाधव ०-२-६
राणी ०-२-६
नरपति ०-२-६
श्वेतवर्ण ०-२-६

सर्व प्रसिद्ध बुकसेलरकडे मिळतात.

## नवभारत प्रकाशनसंस्था. मुंबई ४.

मुद्रक व प्रकाशक—रघुनाथ दिपा[illegible] प्रेस,
६, केळेवाडी, गिर[illegible]

IRBK-0101889
IRBK-0101889